मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पावसाळ्यापूर्वी सर्व नालेसफाई पूर्ण करा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

## आरोग्य विभागाची आढावा बैठक; स्वच्छ सर्वेक्षण 2026 च्या पार्श्वभूमीवर केलेल्या तयारीची माहिती



### नालेसफाईला गती देण्याचे आदेश

» पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व नालेसफाईची कामे वेळेत आणि दर्जेदार पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले. नाल्यांवरील अनधिकृत बांधकामांवर कडक कारवाई करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शहरात पाणी साचू नये यासाठी यंत्रणा सक्षम करण्यावर भर देण्यात आला. स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी असून नागरिकांनी कचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व नालेसफाईची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत. नाल्यांवरील अनधिकृत बांधकामे व आस्थापनांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागाची आढावा बैठक आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी स्वच्छ सर्वेक्षण २०२६ च्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या तयारीचीही माहिती आयुक्तांनी घेतली.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे; उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, सीताराम बहुरे उपस्थित होते. तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ. अभय दादेवर; मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंबासे; सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, सुनील भागवानी, अजय सूर्यवंशी, अनिल भालसाखळे, कार्यकारी अभियंता म्हणून चंद्रकांत मुठाळ, सुनील नरोटे, सतीश वाघमारे, हेमंत देसाई, पी. बी. लांडे, संतोष दुर्वे, महेश कावळे, योगेश आलाट, विजयसिंह भोसले, विजय जाधव, गणेश राऊत , सहायक आयुक्त अमित पंडित, किरणकुमार मोरे, परशुराम वाघमोडे, राजीव घुले; क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, अतुल पाटील, राजाराम सलगर, किशोर ननवरे मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे तसेच सहायक आरोग्य अधिकारी राजू साबळे, सुधीर वाघमारे, योगेश फल्ले, राजेश भाट, अतुल सोनवणे, महेश आढाव, अंकुश झिटे, शांताराम माने आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शहरात पाणी साचू नये आणि नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी यंत्रणा अधिक सक्षम करावी. स्वच्छता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून नागरिकांनी कचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे, पावसाळ्यातील आपत्ती व्यवस्थापन, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजना, प्लास्टिक वापरावर कडक कारवाई आणि तीव्र उन्हाळ्यात उपलब्ध होणाऱ्या वैद्यकीय सुविधांचाही आढावा यावेळी घेण्यात आला.

शहरातील एकूण १४५ नाले आणि सुमारे १४,९१३ मीटर लांबीच्या नाल्यांची सफाई सुरू असल्याची माहिती देण्यात आली. १६ मार्च रोजी केवळ ४.९९% असलेली प्रगती २३ मार्चपर्यंत १३.८३% झाली असून ३० मार्चपर्यंत ती २२.६७% पर्यंत पोहोचली आहे.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्रगती पाहता 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने ३२.२२% प्रगती साधत आघाडी घेतली आहे. 'अ' (२८.२८%) आणि 'ई' (२५.६३%) क्षेत्रीय कार्यालयांनीही चांगली कामगिरी केली असून 'ब' (२४.६७%) आणि 'ग' (२४.३३%) क्षेत्रीय कार्यालयांनीही स्पर्धात्मक वेग दाखवला आहे. यावेळी स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये झिरो वेस्ट स्लम, आर.आर. आर. सेंटर, कचरा व्यवस्थापन, जनजागृती मोहीम, कचरा विलगीकरण, प्लास्टिक बंदी तसेच 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत नव्या उपक्रमांचा समावेश आहे.

# नदी प्रदूषणाची स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी

## प्रदूषण करणाऱ्या घटकांवर कठोर कारवाईचे निर्देश; नदी स्वच्छतेसाठी महापालिकेची ठोस पावले



"पवना नदीचे प्रदूषण ही आपल्या सर्वांसाठी चिंतेची बाब आहे. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शहराचा पर्यावरण समतोल राखण्यासाठी कटिबद्ध आहोत. नदीपात्रात कचरा टाकणाऱ्यांवर आणि बेकायदेशीरपणे सांडपाणी सोडणाऱ्यांवर आता केवळ दंड करून थांबणार नाही, तर त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश मी प्रशासनाला दिले आहेत. प्रशासनाकडून नदीपात्र स्वच्छतेची विशेष मोहीम तातडीने राबवण्यात येईल."
- अभिषेक बारणे, सभापती – स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

**पिंपरी | प्रतिनिधी**

थेरगाव येथील नदी प्रदूषणाच्या वाढत्या समस्येची गंभीर दखल घेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक गोविंद बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष पाहणी केली. प्रदूषण करणाऱ्या घटकांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

सभापती अभिषेक बारणे यांनी पर्यावरण विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि 'ग' क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत थेरगाव बोट क्लब परिसराचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी नदीपात्रात साचलेला कचरा, प्रक्रीया न करता सोडले जाणारे सांडपाणी आणि औद्योगिक प्रदुषणामुळे निर्माण झालेली भीषण परिस्थिती समोर आली. या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य, शेती आणि नदीतील जैवविविधता धोक्यात आल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

या पाहणी दौऱ्यात नदी स्वच्छ ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या आणि कचरा टाकणाऱ्यांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवण्याच्या सूचनाही सभापतींनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# बांधकाम परवानगी उत्पन्नात 86 कोटींची घट

## पर्यावरण मंजुरीतील विलंबाचा फटका; इतर विभागांनी महसूल वाढवला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागास सन 2025-26 या आर्थिक वर्षांत तब्बल 794 कोटी 77 लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या वर्षी सन 2024-25 या वर्षी या विभागास 881 कोटी 30 लाखांचे उत्पन्न मिळाले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा विभागाचे उत्पन्न 86 कोटी 53 लाखांने घटले आहे.

शहरातील मोठ्या बांधकाम प्रकल्पांना महाराष्ट्र राज्यातील पर्यावरण विभागाची ईएस प्रमाणपत्राऐवजी केंद्राच्या पर्यावरण विभागाच्या प्रमाणपत्राची सक्ती करण्यात आली आहे. त्या प्रमाणापत्रासाठी अधिक वेळ जात आहे. तसेच, जागेची मोजणीप्रक्रियेस स्थगिती प्रक्रिया रखडल्याने बांधकाम परवानगी विभागाचे उत्पन्न घटल्याचे सांगण्यात येत आहे.

यंदा 1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या आर्थिक वर्षात बांधकाम परवनागीच्या मुख्य शुल्कातून 711 कोटी 53 लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. युटीएफ शुल्कातून 83 कोटी 24 लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. असे एकूण 794 केटी 77 लाख रुपयांचे उत्पन्न महापालिका तिजोरीत जमा झाले आहे, असे महापालिकेचे सहशहर अभियंता सुनील भागवानी यांनी सांगितले.

महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवानगी विभागास सन 2025-26 या आर्थिक वर्षांत एकूण 21 कोटी 50 लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या वर्षी सन 2024-25 मध्ये त्या विभागास एकूण 19 कोटी 94 लाखांचे उत्पन्न मिळाले होते. या विभागाकडून जाहिरात होर्डिंगला परवाना दिला जातो. परवाना शुल्क आणि नूतनीकरण शुल्कातून या विभागास उत्पन्न मिळते. यंदा एकूण 1 कोटी 56 लाख रुपयांने वर्षभरातील उत्पन्नात भर पडली आहे. सन 2023-24 या आर्थिक वर्षात या विभागास 18 कोटी 50 लाख रूपयांचे उत्पन्न मिळाले होते. शहरातील अनधिकृत होर्डिंगचा शोध घेऊन कारवाई करण्यात आली. शहरातील सर्व होर्डिंगचे परवाना नूतनीकरण करण्यात आले. त्या माध्यमातून शुल्क वाढले. परिणामी, या विभागाचे उत्पन्न वाढले आहे, असे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.



### झोपडपट्टी सेवाकरातून 1 कोटी 15 लाखांचे उत्पन्न

» शहरातील झोपडपट्टीतून महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडून घरटी सेवा कर जमा केला जातो. यंदाच्या सन 2025-26 या आर्थिक वर्षांत सर्वाधिक विक्रमी 1 कोटी 15 लाख रुपयांचे उत्पन्न महापालिका तिजोरीत जमा झाले आहे. महिला बचत गटांकडून प्रत्येक झोपडीधारकांस सेवाकराचे बिल वाटप करण्यात येते. तसेच, ऑनलाईन बिल भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षी मोठी सेवा कराची वसुलीत तिप्पट वाढ झाली आहे. गेल्या सन 2024-25 या आर्थिक वर्षांत 45 लाखांचे उत्पन्न सेवाकरातून मिळाले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा 70 लाख रुपयांची घसघशीत भर पडली आहे, असे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी

### पाणीपट्टीतून 78 कोटींचे उत्पन्न

» महापालिकेकडून निवासी व बिगरनिवासी मिळकतींना पिण्याच्या पाण्याचे जोड दिले जातात. त्याला महापालिका पाणी शुल्क आकारते. त्यातून सन 2025-26 या आर्थिक वर्षांत एकूण 78 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या वर्षी सन 2024-25 या वर्षांत एकूण 76 कोटी 41 लाखांचे उत्पन्न मिळाले होते, असे पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### अग्निशमन विभागाच्या उत्पन्नात वाढ

» महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून इमारत आणि आस्थापनांना फायर सर्टिफिकेट दिले जाते. त्यासाठी शुल्क आकारले जाते. त्यातून अग्निशमन विभागास उत्पन्न मिळते. सन 2025-26 या आर्थिक वर्षात या विभागास एकूण 178 कोटी 27 लाख 22 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या सन 2024-25 या आर्थिक वर्षांत हे उत्पन्न 163 कोटी 4 लाख 11 हजार 651 रुपये इतके होते. यंदा त्यात 15 कोटी 23 लाख रुपयांची वाढ झाली आहे, असे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले.

# कृष्णा चौकात अतिक्रमणांचा विळखा; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

## भाजी विक्रेत्यांमुळे रस्ता अरुंद; रुग्णवाहिकाही अडकतात, नागरिकांची कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवी सांगवीतील वर्दळीचा मानला जाणारा कृष्णा चौक सध्या अनधिकृत भाजीविक्रेते आणि वाढत्या अतिक्रमणांच्या विळख्यात सापडला आहे. यामुळे वाहतूक व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. सिग्नलच्या अगदी शेजारीच रस्त्यावर मांडला जाणारा भाजीपाला, हातगाड्या, पथारीवाले यामुळे वाहनांसाठी अडथळा निर्माण होऊन वाहतूककोंडी होत आहे. परिणामी सिग्नल सुरू असतानाही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक मंदावते विशेषतः संध्याकाळच्या वेळेत परिस्थिती अधिकच बिकट बनत आहे.

कृष्णा चौक परिसर आधीच वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत वर्दळीचा मानला जातो. मात्र, वाढत्या अतिक्रमणांमुळे रस्त्याची रुंदी कमी होत असून, विक्रेत्यांनी केवळ कडेला नव्हे तर थेट रस्त्याच्या मध्यभागापर्यंत अतिक्रमण केल्याचे दिसून येते. यामुळे वाहतूक कोंडीचे प्रकार सातत्याने घडत असून, वाहनचालकांसह पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. पदपथांवरही विक्रेत्यांनी कब्जा केल्याने पादचारी मार्ग जवळपास नसल्यासारखाच आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना जीव मुठीत धरून मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत धोकादायक असल्याची भावना स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. अनेक फेरीवाले चौकातच व्यवसाय थाटत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.



### ठोस उपाययोजनांची मागणी

» कृष्णा चौकातील वाढती अतिक्रमणे लक्षात घेता सिग्नल परिसर तातडीने मोकळा करणे, फेरीवाल्यांसाठी पर्यायी व्यवस्था करून त्यांना अधिकृत मंडईत स्थलांतरित करणे तसेच नियमित वाहतूक पोलिस तैनात करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. केवळ तात्पुरत्या कारवाईवर न थांबता कायमस्वरूपी उपाययोजना राबविल्यासच वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> कृष्णा चौकात हातगाडी व पथारीवाल्यांवर दररोज कारवाई केली जाते. आम्ही कारवाईसाठी गेल्यावर तात्पुरते निघून जातात नंतर पुन्हा त्याच ठिकाणी येऊन बसतात. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल
>
> - राजू कांबळे, कार्यालयीन अधीक्षक, ह क्षेत्रीय कार्यालय, मनपा

# पुणे महापालिकेचे विक्रमी उत्पन्न; 9 हजार कोटींचा टप्पा पार

## महसुलात हजार कोटींची वाढ; पुढील वर्षी लक्ष्य गाठण्याचे मोठे आव्हान



**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने 2025-26 या आर्थिक वर्षात उत्पन्नाच्या बाबतीत नवा विक्रम प्रस्थापित करत 9 हजार कोटींचा टप्पा ओलांडला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे एक हजार कोटी रुपयांची वाढ नोंदवली जाणार असून, महापालिकेच्या इतिहासातील हे आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न ठरणार आहे. प्रशासनासाठी ही महत्त्वाची कामगिरी असली तरी आता नव्या सत्ताधाऱ्यांसमोर हे उत्पन्न टिकवून ठेवण्याचे आणि वाढवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

महापालिका आयुक्तांनी 2025-26 वर्षासाठी 12 हजार 618 कोटींचे अंदाजपत्रक मांडले होते. त्यापैकी 30 मार्चअखेर सुमारे 9 हजार कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. 31 मार्च रोजी सुटी असली तरी ऑनलाईन भरणा सुरू राहणार असल्याने अंतिम आकडा 9 हजार 200 कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

उत्पन्नाच्या प्रमुख स्रोतांमध्ये मिळकतकर आणि जीएसटीचा प्रत्येकी सुमारे 3 हजार कोटींचा वाटा आहे. बांधकाम परवानग्यांमधून यंदा अपेक्षेपेक्षा कमी, सुमारे 2000 ते 2200 कोटींचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय पाणीपट्टीमधून सुमारे 200 कोटी, मुद्रांक शुल्कातून 100 ते 150 कोटी, तसेच शासकीय अनुदान आणि इतर स्रोतांमधून सुमारे 600 कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे. तुलनेत 2024-25 या आर्थिक वर्षात महापालिकेला 8 हजार 272 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते.

भूमिअभिलेख विभागाकडून वहिवाटीच्या मोजण्या बंद केल्यामुळे बांधकाम प्रकल्पांच्या मंजुरीवर परिणाम झाला आहे. तात्पुरते रेखांकन करण्यास नकार मिळत असल्याने अनेक प्रकल्प प्रलंबित राहिले असून, त्याचा थेट परिणाम बांधकाम विभागाच्या उत्पन्नावर झाला आहे.

प्रशासक काळात महापालिकेने उत्पन्नवाढ साधली असली तरी आता नव्या नेतृत्वासमोर आर्थिक लक्ष्य पूर्ण करण्याचे आव्हान उभे आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी 2025-26 साठी 15 हजार 669 कोटींचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. मात्र, जाहीर योजनांची अंमलबजावणी करताना हे उद्दिष्ट गाठणे सत्ताधाऱ्यांसाठी कठीण ठरण्याची शक्यता आहे. महापालिकेने 2025-26 या आर्थिक वर्षात उत्पन्नाच्या बाबतीत नवा विक्रम प्रस्थापित करत 9 हजार कोटींचा टप्पा ओलांडला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे एक हजार कोटी रुपयांची वाढ नोंदवली जाणार असून, महापालिकेच्या इतिहासातील हे आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न ठरणार आहे.

### आव्हाने आणि पुढील लक्ष्य

**» भूमिअभिलेख विभागाकडून मोजण्या बंद केल्यामुळे बांधकाम प्रकल्पांवर परिणाम झाला आहे. त्यामुळे अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिले असून, त्याचा थेट फटका उत्पन्नावर बसला आहे. नव्या सत्ताधाऱ्यांसमोर आता हे उत्पन्न टिकवणे आणि वाढवणे हे मोठे आव्हान आहे. 2025-26 साठी 15,669 कोटींचे लक्ष्य ठेवण्यात आले असले तरी ते गाठणे कठीण मानले जात आहे.**

### उत्पन्नात ऐतिहासिक विक्रम

**» महापालिकेने 2025-26 या आर्थिक वर्षात उत्पन्नाच्या बाबतीत नवा विक्रम करत 9 हजार कोटींचा टप्पा ओलांडला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे 1 हजार कोटी रुपयांची वाढ नोंदली गेली आहे. 30 मार्चअखेर 9 हजार कोटींचे उत्पन्न जमा झाले असून, ऑनलाइन भरण्यामुळे अंतिम आकडा 9200 कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या इतिहासातील हे आतापर्यंतचे सर्वाधिक उत्पन्न ठरणार आहे.**

### उत्पन्नाचे प्रमुख स्रोत

**» उत्पन्नाच्या प्रमुख स्रोतांमध्ये मिळकतकर आणि जीएसटीचा प्रत्येकी सुमारे 3 हजार कोटींचा वाटा आहे. बांधकाम परवानग्यांमधून अपेक्षेपेक्षा कमी, सुमारे 2000 ते 2200 कोटींचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. पाणीपट्टीमधून 200 कोटी, मुद्रांक शुल्कातून 100 ते 150 कोटी, तसेच शासकीय अनुदान व इतर स्रोतांमधून सुमारे 600 कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे.**

# पुण्यात रस्त्यांच्या जागांचा तातडीने ताबा; जोते तपासणीपासून नवा नियम

## पुणे महापालिकेचा निर्णय; बांधकाम परवानगीनंतर जोते तपासणीवेळीच रस्त्यांच्या जागा ताब्यात घेऊन तातडीने डांबरीकरण केले जाणार



**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून बांधकाम परवानगी दिल्यानंतर रस्त्यांसाठी राखीव ठेवलेल्या जागांचा ताबा घेण्याच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात येणार आहे. यापुढे जोते तपासणीच्या टप्प्यावरच महापालिका या जागा ताब्यात घेणार असून, ताबा मिळताच त्या ठिकाणी तातडीने डांबरीकरण करून रस्ते सार्वजनिक वापरासाठी खुले करण्यात येणार आहेत, अशी माहिती शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली.

विकास आराखड्यानुसार बांधकाम परवानगी देताना संबंधित विकसकांना रस्त्यासाठी जागा सोडणे बंधनकारक असते. या जागेच्या बदल्यात बांधकाम प्रकल्पांना त्यानुसार एफएसआय दिला जातो. आत्तापर्यंत ही जागा बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र देण्यापूर्वी ताब्यात घेतली जात होती.

मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या जागांचा वापर विकसकांकडूनच सुरू राहत होता. काही ठिकाणी ताबा घेतल्याची नोंद असूनही महापालिकेचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला नसल्याचेही निदर्शनास आले आहे. अनेक ठिकाणी ताबा यादीनंतरही महापालिकेचे नामफलक लावले गेले नाहीत, त्यामुळे या जागांचा सार्वजनिक वापर होत नसल्याची समस्या निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर आता बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर जोते तपासणीच्या वेळीच रस्त्यासाठी सोडलेली जागा महापालिका ताब्यात घेणार आहे. ताबा मिळाल्यानंतर तत्काळ डांबरीकरण करून रस्ता वापरासाठी उपलब्ध करून दिला जाईल तसेच यापूर्वी परवानगी दिलेल्या प्रकल्पांमधील रस्त्यांच्या जागा ताब्यात घेण्यासाठीही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

### पाणीपुरवठ्याची जबाबदारी विकसकाकडेच

**» दरम्यान, समाविष्ट 32 गावांतील बांधकाम परवानग्यांबाबत पारदर्शकता वाढविण्यासाठी महापालिकेकडून ही माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. या गावांमध्ये अनेक ठिकाणी अद्याप पाणीपुरवठा व्यवस्था विकसित झालेली नाही. त्यामुळे पीएमआरडीएच्या धर्तीवर महापालिका पाणीपुरवठा योजना पूर्ण होईपर्यंत संबंधित प्रकल्पांना पाणी पुरविण्याची जबाबदारी विकासकांवरच राहील, असे प्रतिज्ञापत्र घेतले जाणार आहे. हे प्रतिज्ञापत्र देखील संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल; जेणेकरून नागरिकांना प्रकल्पातील पाण्याच्या व्यवस्थेबाबत स्पष्ट माहिती मिळू शकेल, असेही पावसकर यांनी सांगितले.**

# पाषाणमध्ये हायटेक 'पासपोर्ट सेवा केंद्र'; मुंढव्यातील कार्यालय बंद

## वाढती गर्दी आणि अत्याधुनिक सुविधांमुळे हा निर्णय घेतल्याचे क्षेत्रीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी सांगितले.

**पुणे | प्रतिनिधी**

जागा अपुरी पडत असल्याने मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राचे (पीएसके) पाषाण येथे स्थलांतर करण्यात आले. वाढती गर्दी आणि अत्याधुनिक सुविधांमुळे हा निर्णय घेतल्याचे क्षेत्रीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

दरम्यान, ३० मार्चनंतर मुंढवा केंद्राची 'अपॉइंटमेंट' घेतलेल्या नागरिकांनी पाषाण येथील नवीन केंद्रात त्याच तारखेला आणि दिलेल्या वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

बाणेर-पाषाण लिंक रस्त्यावरील 'मॉटक्लेयर बिल्डिंग' या नवीन वास्तूत या केंद्राचे कामकाज सोमवारपासून सुरू झाले. या पार्श्वभूमीवर गायकवाड यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बाणेर, पाषाण, औंध, बावधन आणि हिंजवडी आयटी पार्क परिसरातील नागरिकांसाठी हे नवीन केंद्र अधिक सोयीचे ठरणार असून, नव्या कार्यालयात आधुनिक सुविधा असल्याचे गायकवाड यांनी नमूद केले.



### नागरिकांसाठी अधिक सुविधा

» नवीन पारपत्र सेवा केंद्र बाणेर, पाषाण, औंध, बावधन आणि हिंजवडी परिसरातील नागरिकांसाठी अधिक सोयीचे ठरणार आहे. आधुनिक सुविधा आणि प्रशस्त जागेमुळे अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. वाढत्या आयटी उद्योग आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमुळे पारपत्र सेवांची मागणी वाढली असून, त्यानुसार सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

### पीएसकेचे पाषाणला स्थलांतर

» मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्र (PSK) जागा अपुरी पडत असल्याने पाषाण येथे हलवण्यात आले आहे. वाढती गर्दी आणि अधिक चांगल्या सुविधांच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला. बाणेर-पाषाण लिंक रस्त्यावरील मॉटक्लेयर बिल्डिंगमध्ये नवीन केंद्र सुरू झाले असून, ३० मार्चनंतर अपॉइंटमेंट असलेल्या नागरिकांनी त्याच वेळेत पाषाण केंद्रात उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### अर्ज प्रक्रियेला गती

» पारपत्रासाठी अर्जांची संख्या वाढत असल्याने प्रक्रिया जलद करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून अर्ज छाननी अधिक वेगाने केली जात आहे. फेब्रुवारी महिन्यात सुमारे ४० हजार अर्जांपैकी ९० टक्के अर्जदारांना पारपत्र देण्यात आले, तर काही अर्ज कागदपत्रांच्या त्रुटींमुळे नाकारण्यात आले.

ते म्हणाले, 'पुण्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण होत आहे. ग्लोबल कपॅसिटी सेंटर आणि काही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय कंपन्या पुण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पारपत्राची सुविधा जलद आणि सोयीसुविधांनी युक्त असणे गरजेचे आहेत. पारपत्रासाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने वाढत आहे. वाढत्या गर्दीमुळे मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राची जागा अपुरी पडत होती. हिंजवडी आणि परिसरातील आयटी कंपन्यांच्या दृष्टिने अंतराचाही प्रश्न होता. त्यामुळे या केंद्राचे स्थलांतर करण्यात आले. आता नव्या पारपत्र सेवा केंद्रात सुसज्ज जागा आणि अधिक सोयीसुविधा आहेत.'

'पारपत्रासाठीचे अर्ज नाकारता येत नाहीत. पडताळणी केल्यानंतर निकषांनुसार प्रत्येकाला पारपत्र द्यायचे असते. त्यासाठीची अर्जप्रक्रिया जलद करण्याच्या दृष्टिने अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. काही प्रमाणात अर्जांची छाननी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवण्यात आली आहे. फेब्रुवारीच्या एका महिन्यात ४० हजारांहून अधिक सुमारे ९० टक्के अर्जदारांना पारपत्र देण्यात आले, तर कागदपत्रांच्या अभावामुळे आणि पडताळणीत आढळलेल्या त्रुटींमुळे काही अर्ज नाकारण्यात आले,' असेही त्यांनी नमूद केल

जागा अपुरी पडत असल्याने मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राचे (पीएसके) पाषाण येथे स्थलांतर करण्यात आले. वाढती गर्दी आणि अत्याधुनिक सुविधांमुळे हा निर्णय घेतल्याचे क्षेत्रीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# बारामती-फलटण महामार्ग प्रकरणात जुना निवाडा रद्द, हायकोर्टाचा निर्णय

## बारामती-फलटण महामार्ग प्रकरणात जुना निवाडा रद्द; नव्याने संपादनाचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती-फलटण राज्य महामार्ग क्रमांक 10 च्या भूसंपादन प्रक्रियेबाबत सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत डॉ. राजेंद्रकुमार नानासाहेब सस्ते यांच्या संघर्षाला यश मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने याप्रकरणी डॉ. सस्ते यांच्या बाजूने निकाल देत, प्रशासनाने केलेल्या भूसंपादनाच्या प्रक्रियांवर ताशेरे ओढत निर्धारित कालावधीचे पालन न केल्यामुळे पूर्वीचा निवाडा रद्द करून नव्याने भूमी संपादन करावयाचे आदेश पारित केले, अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी हा निकाल फायदेशीर ठरणार आहे.



### बाधित शेतकऱ्यांना फायदेशीर निकाल!

» सार्वजनिक हितासाठी जमीन संपादित करण्याचा अधिकार शासनाला असला तरी ही प्रक्रिया विहित कायदेशीर मार्गाने झाली पाहिजे, कोणत्याही नागरिकाला त्याच्या मालमत्तेपासून वंचित ठेवताना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. भविष्यातील भूसंपादन करताना सरकारी विभागाला अधिक सतर्क करावे लागणार आहे. राज्यातील बाधित शेतकऱ्यांना दिशादर्शक ठरेल, असा हा निकाल आहे.

राज्य महामार्ग क्रमांक 10च्या रुंदीकरणाच्या भूमी संपादनासाठी सन 2016 साली निवाडा घोषित करण्यात येऊन यामध्ये डॉ. राजेंद्र सस्ते यांची जमीन संपादित करण्यात आली होती. याविरोधात डॉ. सस्ते यांनी यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून ही प्रक्रिया राबवताना भूसंपादन कायद्याचे उल्लंघन झाल्याचा दावा केला होता.

सार्वजनिक हितासाठी जमीन संपादित करण्याचा अधिकार शासनाला असला तरी ही प्रक्रिया विहित कायदेशीर मार्गाने झाली पाहिजे, कोणत्याही नागरिकाला त्याच्या मालमत्तेपासून वंचित ठेवताना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. भविष्यातील भूसंपादन करताना सरकारी विभागाला अधिक सतर्क करावे लागणार आहे. राज्यातील बाधित शेतकऱ्यांना दिशादर्शक ठरेल, असा हा निकाल आहे.

जमिनीचा योग्य मोबदला न मिळणे आणि नोटीस बजावण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचे तसेच दिरंगाई झाल्याचे मुद्दे त्यांनी न्यायालयासमोर मांडले होते. न्यायमूर्ती मनीष पितळे व न्यायमूर्ती एस. वाय. शिरसाट यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेत पूर्वीचा केलेला भूसंपादनाचा निवाडा रद्द करून भूसंपादन कायदा 2013 अन्वये भूमी संपादन करण्याचे आदेश दिले. याचिकाकर्ते सस्ते यांच्या वतीने ॲड. सुशांत प्रभुणे यांनी युक्तिवाद केला.